## नवी मुंबई महानगर पालिका
## सन 2005-2006 चा सुधारीत व सन 2006-2007 चा मुळ अर्थसंकल्प
## आयुक्तांचे निवेदन

महानगरपालिकेच्या जमेच्या विविध स्त्रोतांचा विचार करुन रु.44409.97 लक्ष जमा, रु. 57626.53 लक्ष खर्च व रु. 2.71 लक्ष शिल्लकीचा सन 2006-2007 चा मुळ अर्थसंकल्प व रु.41527.22 लक्ष जमा, आणि रु.36616.46 खर्चाचा सन 2005-2006 चा सुधारीत अर्थसंकल्प अ व क मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 मधील कलम 95 न्वये मान्यतेस प्रस्तावित आहे.

सन 2005-2006 या चालू वित्तीय वर्षाच्या मूळ अंदाजपत्रकात प्रारंभीची शिल्लक रु. 8308.51 लक्ष रक्कमेसह एकूण जमा रु. 46634.84 लक्ष व खर्च रु. 54940.82 लक्ष रकमेचे वार्षिक लक्षांक मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीने निश्चित करण्यात आले होते. माहे डिसेंबर, 2005 पर्यंत लक्षाकांच्या तुलनेत प्रत्यक्ष जमा रु. 26923.04 लक्ष असून जानेवारी, 2006 ते मार्च, 2006 पर्यंत जमा रु. 14604.18 लक्ष अपेक्षित आहे.

सन 2005-06 च्या सुधारित अंदाजपत्रकातील जमेच्या ठळक बाबी :-

| अ.क्र | विभागाचे नाव | वार्षिक लक्षांक | डीसें 2005 पर्यंतची प्रत्यक्ष जमा | जाने 2006 ते मार्च 2006 पर्यंतची अपेक्षित जमा | एकुण सुधारीत जमा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | उपकर | 11750.00 | 9056.02 | 3403.98 | 12550.00 |
| 2 | मालमत्ता कर | 10092.34 | 7767.68 | 2369.97 | 10137.65 |
| 3 | पाणी पट्टी | 4876.00 | 3374.16 | 1511.34 | 4885.50 |
| 4 | नगर रचना विकास शुल्क | 4250.00 | 2654.80 | 884.90 | 3539.70 |
| 5 | महानगर पालिकेच्या मालमत्तेपासुन मिळणारे उत्पन्न-भुखंड विक्री | 6200.00 | 1896.00 | 4480.40 | 6376.40 |
| 6 | दवाखाने शुल्क | 274.95 | 201.02 | 63.69 | 264.71 |
| 8 | मलनिस्सारण वाहिनी शुल्क | 511.65 | 319.29 | 151.35 | 470.64 |
| 10 | आरंभीची शिल्लक | 8308.51 | 8308.51 | 13751.11 | 8308.51 |

सन 2005-2006 मध्ये मा.सर्वसाधारण सभेने निर्धारित केलेल्या लक्षांकाची पुर्तता करण्यात आलेली आहे. सन 2005 मधील महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या आचारसंहितेमुळे सन 2005-2006 च्या अर्थसंकल्पास दिनांक 23/8/2005 रोजी मंजूरी देण्यात आली. तद्नंतर मा.महापौर, मा.स्थायी समिती सभापती व विविध समित्यांच्या निवडणुकींसाठी काही कालावधी लागला. त्यामुळे सन 2005-2006 या वित्तीय वर्षात महसूली खर्च काही प्रमाणात कमी झाला. मात्र सन 2005-06 च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आलेल्या भांडवली स्वरुपाच्या कामांना प्रशासकीय मंजूरी व निविदा अंतिम करण्यास गती देण्यात आलेली आहे. त्यामध्ये मुख्यत्वे ठाणे-बेलापूर रस्त्याची सुधारणा, महानगरपालिका मुख्यालयाच्या इमारतीचे बांधकाम, मोरबे जलस्त्रोतातील पाण्यासाठी कळंबोली ते दिघा पर्यंत मुख्य जलवाहिनी टाकणे, रोड व्हिजन 2005 मधील कामे, इ.बाबींचा समावेश आहे.

सुधारित अर्थसंकल्पातील नागरी सुविधांवरील खर्चाच्या ठळक बाबी:-

| अ.क्र | विभागाचे नाव | वार्षिक लक्षांक | डीसें 2005 पर्यंतचा प्रत्यक्ष खर्च | जाने 2006 ते मार्च 2006 पर्यंतचा अपेक्षित खर्च | एकुण सुधारीत खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 1 | रस्ते, फुटपाथ, गटारे इत्यादी कामांवरील खर्च | 8510.97 | 1986.97 | 2972.08 | 4959.05 |
| 2 | पाणी पुरवठा खर्च | 9184.26 | 5612.93 | 2032.78 | 7645.71 |
| 3 | विद्युत खर्च | 3183.00 | 507.73 | 963.80 | 1471.53 |
| 4 | सार्व. आरोग्य अभियांत्रिकी | 2692.44 | 1061.46 | 475.18 | 1536.64 |
| 5 | शहर साफसफाई | 3295.00 | 1369.86 | 1158.50 | 2528.36 |
| 6 | रुग्णालयीन सेवा | 1225.32 | 388.07 | 346.49 | 734.56 |
| 7 | उद्याने | 790.00 | 134.41 | 439.37 | 573.18 |
| 8 | शिक्षण विभाग | 1849.13 | 506.84 | 286.30 | 793.14 |
| 9 | शासकीय कर, कर्ज परतावा (राज्य शिक्षण व रोजगार हमीकर,) | 2324.71 | 1150.15 | 900.00 | 2050.15 |
| 10 | मोरबे धरण | 7896.85 | 3429.59 | 2129.33 | 5558.92 |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 मधील तरतूदींनुसार आगामी वित्तीय वर्षासाठी अंदाजपत्रक अ व क प्रमुख सेवानुरुप दोन भागांमध्ये तयार करण्यात आलेला आहे. त्यानुसार पुरविण्यात येणाऱ्या प्रत्येक सेवांपासून प्राप्त होणारे उत्पन्न व त्यावर होणारा खर्च याचे विश्लेषण अर्थसंकल्पात करण्यात आले आहे. मागील वित्तीय वर्षाप्रमाणे यावर्षी सुध्दा आस्थापनेवरील खर्च व महसूली खर्च नियंत्रणात राहिल्याने भांडवली कामांच्या खर्चासाठी पुरेसा निधी उपलब्ध झाला. महसूली उत्पन्नातून रु.13925.38 लक्ष इतकी रक्कम भांडवली कामासाठी उपलब्ध झाली आहे. सन 2006-2007 मध्ये महसूली उत्पन्न रु.33311.29 लक्ष अपेक्षित असून कर वसुलीवर अधिक लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

सन 2005-2006 मधील प्रशासनाकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या भांडवली स्वरुपाच्या कामांना मा.स्थायी समिती व मा.सर्वसाधारण सभेने प्रशासकीय व वित्तीय मंजूरी दिल्याने या सर्व लोकोपयोगी कामांना मुर्त स्वरुपात आणण्यात येत आहे. सन 2006-2007 चे अंदाजपत्रक रु.57629.24 लक्षचे असून त्यामध्ये आरंभीची शिल्लक रु. 13219.27 लक्ष इतकी आहे. या अर्थसंकल्पात मागील वित्तीय वर्षात मंजूर करण्यात आलेल्या मोठया भांडवली कामांचा समवेश असल्याने स्पील ओव्हरची तरतूद रु.12006.49 लक्ष इतकी आहे. सन 2006-2007 साठी सेवानिहाय प्रस्तावित करण्यात आलेल्या तरतूदींचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

**रस्ते व दिवाबत्ती** :- शहरातील रस्त्यांचा विकास करण्यासाठी सन 2005-2006 मध्ये रोड व्हिजन 2005 आराखडा तयार करण्यात आला होता. त्यासर्व कामांना मंजूरी मिळालेली असून अर्थसंकल्पात रु.117 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ठाणे-बेलापूर रस्त्याचे सहापदरीकरण करण्यासाठी रु.50 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी रु.30 कोटी इतका निधी ASIDE अंतर्गत

केंद्रशासनाकडून प्राप्त होणार आहे. शहरातील प्रमुख नोडमधील मुख्य रस्त्यांचे पुन:पृष्ठीकरणासहीत काही गावठाणातील रस्त्यांच्या कामांचा समावेश करण्यात आलेला आहे. शहरसौदर्यीकरणाचा भाग म्हणून मुख्य रस्त्यांच्या दुभाजकांमध्ये शोभिवंत झाडे लावण्याचा समावेश त्या त्या कामाच्या अंदाजपत्रकामध्येच करण्यात आलेला आहे. सन 2005-2006 पर्यंत 1400 दिवाबत्तीची सुधारणा करण्यात आलेली आहे. उर्वरित सर्व दिवाबत्ती सुधारणा कामे आगामी वर्षात पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. शहरातील विद्युत वाहिन्या भूमिगत करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास कर्ज रुपाने निधी उपलब्ध करुन देण्यास रु.5 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

**घनकचरा व्यवस्थापन** :- सन 2005-2006 मध्ये कोपरखैरणे येथील क्षेपणभूमी शास्त्रोक्त पध्दतीने बंद करण्यासाठीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला असल्याने त्यासाठी रु.4 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

**ज्येष्ठ नागरीकांसाठी विमा योजना** :- शहरातील ज्येष्ठ नागरीकांना विमा संरक्षण देण्यासाठी याच वर्षी प्रस्ताव सादर करण्यात येत असून हि योजना आगामी वर्षातही लागू राहील त्यासाठी रु.10 लक्ष तरतूद प्रस्तावित आहे.

**सार्वजनिक आरोग्य व रुग्णालयीन सेवा** :- महानगरपालिका क्षेत्रात रुग्णालयीन सेवेबरोबर Preventive Health Care कडे विशेष लक्ष देण्याचा मानस आहे. त्यानुसार हिवताप निर्मुलन, श्वाननियंत्रण, पल्स पोलिओ, इ. कार्यक्रमावर विशेष भर देण्यात येणार आहे. RCH योजनेसाठी राज्य शासनाने पुढील पाच वर्षासाठी 3.11 कोटी एवढे अनुदान मंजूर केले आहे. त्या अंतर्गत झोपडपट्टी विभागात नागरी आरोग्य केंद्र कार्यान्वित करणे व प्रति 1000 लोकसंख्येमागे 1 आरोग्य रक्षक नेमणे यांचा अंतर्भाव आहे.

**सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी :-** सन 2005-2006 मध्ये गावठाण विस्तार व मूळ गावठाणातील काही मल:निस्सारण वाहिन्या टाकण्यासाठी तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली होती. आगामी वर्षातही यासाठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. शहरातील मल:निस्सारण केंद्रामध्ये आधुनिक तंत्राने सुधारणा करणे आवश्यक असल्याने त्यासाठीही भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. शहरात एकुण 5 मलनिस्सारण केंद्र आहेत. त्यापैकी आगामी वर्षात वाशी, नेरुळ (पामबीच), ऐरोली येथील मलनिस्सारण केंद्राची पुनर्बांधणी करण्यात येणार आहे. त्यासाठी रु.40 कोटींची तरतूद करण्यात आली असून उर्वरीत दोन मलनिस्सारण केंद्र पुढील वर्षात घेण्यात येतील.

**सार्वजनिक शौचालये** :- नवी मुंबई शहरातील गावठाणे, झोपडपट्ट्या या ठिकाणी महानगरपालिकेतर्फे सार्वजनिक शौचालये बांधण्यात येत आहेत. शहर, गाव, गावठाण, झोपडपट्टी भागातील नागरीकांना उघड्यावर शौचास बसण्यासाठी फक्त प्रतिबंधात्मक उपाय न करता त्यांना यापासून परावृत्त करण्यासाठी पुरेश्या सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न आहे. ज्या ठिकाणी अशी शौचालये अद्याप पर्यंत बांधण्यात आलेली नाहीत अशा ठिकाणच्या रहिवाशींना उघडयावर शौचास बसावे लागू नये याकरीता तेथे लवकरात लवकर सार्वजनिक शौचालये बांधण्यात येतील याकरीता अर्थसंकल्पात रु.720 लक्ष इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच यापुर्वी ग्रामपंचायतीने बांधलेल्या शौचालयांची विशेष दुरुस्ती करण्यात येत आहे.

**मोरबे धरण** :- मोरबे धरणाच्या दुसऱ्या टप्प्याचे काम पुर्णत्वास आले असून शहरातील सर्व भागांमध्ये सन 2007-2008 पर्यंत 24 तास पाणी पुरवठा वितरीत करण्याचा मानस आहे. त्यासाठी कळंबोली ते दिघा पर्यंत मुख्य जलवाहिनी टाकणे व त्या अनुषंगीक कामांकरीता रु.40 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर कामे

Defer Paymant तत्वावर करण्यास मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. त्यातील पहिल्या टप्प्याचे काम जानेवारी, 2007 पर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे.
शहराला 24 तास पाणीपुरवठा करण्यासाठी जलमापक बसविणे आवश्यक आहे. याबाबत मी मागील अर्थसंकल्पात ही आग्रही भुमीका घेतली होती. त्यास सर्व सन्माननीय लोकप्रतिनिधींनी सकारात्मक प्रतिसाद दिला त्याबद्दल सर्वांचे मन:पुर्वक आभार. सन 2006-2007 मध्ये सर्व वाणिज्य दराच्या ग्राहकांना Tamper Proof European Economic Commission चे मीटर बसविण्यासाठी सर्वसाधारण सभेने यापूर्वीच मान्यता दिली असून टप्प्या-टप्प्याने सर्व ग्राहकांना या योजनेत समाविष्ट करुन घेतले जाईल. जलमापक बसविण्यासाठी शासनाकडुन 23% अनुदान मिळविता येईल. त्यात महापालिकेचे 23% अनुदान असे एकुण 46% खर्चाचा भार ग्राहकांवर पडणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. 24 तास पाणीपुरवठा करण्याचे ध्येय ठेवून त्यासाठी कार्यक्षम यंत्र सामुग्री (Pumping Machinery)खरेदी व आवश्यक तेथे जलवाहिन्या टाकण्यासाठी विशेष तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

मोरबे धरण परिसराची सुधारणा करण्यासाठी रु.5 लक्षाची तरतूद करण्यात आलेली असून एम.एम.आर.डी.ए. व एम.टी.डी.सी. यांच्या सहकार्याने एक पर्यटन स्थळ विकसित करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. त्याचे अंदाज आराखडे आगामी वर्षात पुर्ण होतील.

**अग्निशमन** :- शहरातील अग्निशमन दलाचे सक्षमीकरण करण्यासाठी सन 2005-2006 मध्ये भरीव तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार अग्निशमन केंद्रासाठी अत्याधुनिक वाहने, प्रशिक्षीत कर्मचारीवर्ग, इमारती उपलब्ध करुन देणार आहे. शहरात बहुमजली इमारतींची संख्या दिवसेदिवस वाढत आहे. 25 मजल्यापर्यंत पोहोचण्यासाठी Branto Skylift खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी रु.292.50 लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

सन 2006-2007 मध्ये शहर सौंदर्यीकरणासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये चौकांचे सुशोभीकरण, उद्यांन, फुटपाथ रंगरंगोटी, लेनमार्किंग, तलावांचे सुशोभीकरण इ कामांचा समावेश असेल. मागील वर्षाचे अर्थसंकल्पात बालोद्यानाची संकल्पना मांडण्यात आली त्याचबरोबर मुलांसाठी घ्सायन्स म्यझिअमङ उभारण्यासाठी अर्थसंकल्पात रु.50 लक्ष ची तरतूद करण्यात आली आहे.

**TRAUMA Unit** स्थापनेसाठी लोकप्रतिनिधींची या युनिटसाठी ब-याच वर्षांपासून मागणी आहे. केंद्र शासनाकडुन अनुदान मिळणे अपेक्षीत आहे. त्यानुसार तातडीने प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. महापालिकेचा हिस्सा म्हणुन यावर्षी रु.5 लक्ष ची तरतूद करण्यात आली आहे.

**नगरसेवक स्वेच्छा निधी** - शासन परिपत्रक क्रमांक एएमसी-14200/2264/प्र.क्र.144/नवि-24, दिनांक 1 जानेवारी, 2001 मधील मार्गदर्शक निर्देशानुसार, नगरसेवक स्वेच्छा निधी अंतर्गत गतवर्षी ठेवण्यात आलेली रु.405 लक्ष तरतूद वाढवून आगामी अंदाजपत्रकीय वर्षात रु.540 लक्ष करण्यात आली आहे. अर्थसंकल्पामध्ये नगरसेवक निधीकरीता स्वतंत्र लेखाशिर्ष न ठेवता अंदाजपत्रकात नमूद केलेल्या विहित लेखाशिर्षातील तरतूदींमधून व शासन परिपत्रक क्रमांक एएमसी

14200/2264/प्र.क्र.144/नवि-24, दिनांक 26 फेब्रुवारी, 2001 नुसार सन्मा.नगरसेवकांना कामे करता येतील.

**प्रभाग समिती निधी -** महानगरपालिकेच्या प्रभाग समितीच्या कामकाजासाठी रु. 630 लक्ष रकमेची तरतूद करण्यात आली आहे. अर्थसंकल्पामध्ये प्रभाग समिती निधीकरीता स्वतंत्र लेखाशिर्ष ठेवण्यात आली नसून अंदाजपत्रकात नमूद केलेल्या विहित लेखाशिर्षातील तरतूदींमधून कामे करता येतील.

महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रात नागरी सुविधा पुरविण्यासाठी रु.1114 लक्ष इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामध्ये मुख्यत्वे रस्ते सुधारणा, दिवाबत्ती, ड्रेब्रिज उचलणे, साफसफाई, इ. बाबींचा समावेश आहे.

महापालिका आयुक्त म्हणून कार्यभार चालविताना मा.महापौर, मा. उप महापौर, मा. अध्यक्ष स्थायी समिती, मा. विरोधी पक्षनेते, मा.सभागृह नेते, प्रभाग समित्या व इतर समित्यांचे अध्यक्ष, सर्व मा.सभासद, माझे सहकारी अधिकारी व कर्मचारी, औद्योगिक व स्वयंसेवी संस्था यांचे कायम बहुमोल सहकार्य लाभले व लाभत असते. याबद्दल सर्वांचे मनःपुर्वक आभार मानतो. आगामी अर्थसंकल्प राबविताना व आम्ही आखलेला कार्यक्रम मूर्त स्वरुपात आणण्यासाठी आम्हाला असेच सहकार्य लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करुन हा अर्थसंकल्पिय आराखडा मा.स्थायी समितीस आज सादर करीत आहे.

नवी मुंबई

दिनांक 16/02/2006

**मधुकर कोकाटे**
**आयुक्त**
**नवी मुंबई महानगर पालिका**